# फॉरेस्ट डेव्हलपमेंट कार्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमीटेड

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

सीआयएन क्र. U45200MH1974SGC017206

पंजीकृत कार्यालय : एफडीसीएम भवन, अंबाझरी, हिंगना रोड, नागपूर- 440036

**कार्यालय- विभागीय व्यवस्थापक, एफडीसीएम लि. मार्खन्डा वन प्रकल्प विभाग**

**वनविकास भवन, गौरक्षण वार्ड, बल्लारपूर, तह. बल्लारपूर, जि. चंद्रपूर**

फोन नं. 07172-240356 dm_mar123@rediffmail.com web site:www.fdcm.nic.in


क्रमांक : विव्यमा / भांडार / 2024-25/ 2222 बल्लारशाह, दिनांक 10-01-2025

## :: निरुपयोगी भंगार साहित्याची जाहिर खुल्या लिलाव पध्दतीने विक्री ::

वनविकास महामंडळातील निर्लेखीत भंगार लोखंडी साहित्य खुल्या निविदा पध्दतीने विक्री करणेकरीता लॉट लावण्यात आलेल्या जागेवर आहे. त्या परीस्थीतीत जाहिर खुला लिलाव दि.16.01.2025 रोजी सकाळी 11.00 ते लिलाव संपेपर्यंत एफडीसीएम लिमीटेड, वनपरिक्षेत्र अधिकारी, एलगुर यांचे अधिनस्त रोपवाटीका कार्यालय, एलगुर येथे घेण्यात येत आहे. तरी ईच्छुक खरेदीदारांनी दिलेल्या वेळी व स्थळी उपस्थीत राहावे.

टिप :-

1. ईच्छुक खरेदीदारांना नमुद निर्लेखीत साहित्य वनविकास महामंडळाच्या वनपरिक्षेत्र अधिकारी, एलगुर अंतर्गत येत असलेल्या रोपवाटीका कार्यालय येथे कार्यालयीन वेळेत बघता येतील.
2. विक्रीकरीता ठेवण्यात आलेले निर्लेखीत साहित्याची यादी, अटी व शर्ती www.fdcm.nic.in या संकेतस्थळावर पाहता येईल.
3. अधिक माहितीकरिता कार्यालयीन दुरध्वनी क्रं. 07172-240356, Mobile No.8830373675

(तुषार तडस)<br>
विभागीय व्यवस्थापक<br>
मार्खंडा वन प्रकल्प विभाग,<br>
बल्लारशाह

*वनांचा समग्र विकास हाच आमचा ध्यास*

FDCM
# फॉरेस्ट डेव्हलपमेंट कार्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमीटेड
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
सीआयएन क्र. U45200MH1974SGC017206
पंजीकृत कार्यालय : एफडीसीएम भवन, अंबाझरी, हिंगना रोड, नागपूर- 440036

कार्यालय- विभागीय व्यवस्थापक, एफडीसीएम लि. मार्खन्डा वन प्रकल्प विभाग
वनविकास भवन, गौरक्षण वार्ड, बल्लारपूर, तह. बल्लारपूर, जि. चंद्रपूर
फोन नं. 07172-240356 dm_mar123@rediffmail.com web site:www.fdcm.nic.in

क्रमांक : विव्यमा / भांडार / 2024-25/ बल्लारशाह, दिनांक

## निरुपयोगी भंगार साहित्याची खुल्या पध्दतीने विक्री करावयाच्या अटी व शर्ती

1. लॉट निहाय विक्रीकरीता ठेवण्यात आलेल्या निरुपयोगी भंगार साहित्याचे वर्णन माहितीनुसार बरोबर आहे. विक्रीकरीता ठेवण्यात आलेली निरुपयोगी भंगार साहित्य आहे त्या स्थीतीत व आहे त्या जागी विक्री करावयाची आहेत. ईच्छुक निविदाधारकांनी लॉट निहाय लावलेल्या निरुपयोगी भंगार साहित्याची प्रत्यक्ष तपासणी करुन निरुपयोगी भंगार साहित्याचे वर्णन इत्यादी बरोबर/खरे असल्याबाबत स्वत: खात्री करावी. निरुपयोगी भंगार साहित्याची पाहणी/तपासणी खुल्या लिलावापूर्वी कार्यालयीन वेळेत करता येईल. विक्रीस ठेवलेल्या निरुपयोगी भंगार साहित्याचे चुकीचे वर्णन देण्यात आले या बाबीवर विक्री रद्द करता येणार नाही व कसलीही नुकसान भरपाई देता येणार नाही.
2. खुल्या लिलावात सहभाग घेण्यासाठी लिलावाचे दिवशी किमान रु.1000/- रक्कम EMD स्वरुपात भरणे आवश्यक आहे. त्यानंतरच बोली स्वीकाल्या जाईल.
3. वैयक्तीक खरेदीदारास भंगार साहित्याचे खुल्या लिलावात भाग घेण्यापुर्वी आधारकार्ड, पॅन कार्ड, ई. दस्ताऐवजाची सत्यप्रत EMD स्वीकारणाऱ्या अधिकाऱ्याकडे जमा करणे अनिवार्य आहे.
4. Firm अंतर्गत भंगार साहित्याचे खुल्या लिलावात भाग घेणारे खरेदीदारास खुल्या लिलावात भाग घेण्यापुर्वी आस्थापना नोंदणी प्रमाणपत्र, पॅन कार्ड, जीएसटी प्रमाणपत्र, ओळखपत्र, ई. दस्ताऐवजाची सत्यप्रत EMD स्वीकारणाऱ्या अधिकाऱ्याकडे जमा करणे अनिवार्य आहे.
5. खरेदीदाराने EMD फॉर्मवर स्वत:चा पोष्टाचा पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता लिहणे आवश्यक आहे. पत्यात काही बदल झाल्यास त्याबाबतची माहिती त्वरीत या कार्यालयांस देणे बंधनकारक राहील.
6. खरेदीदाराने खरेदी केलेल्या किंमतीच्या 25% रक्कम अनामत रक्कम म्हणुन (EMD) बँक ड्राफ्ट / RTGS / Pay Order चे स्वरुपात जोडणे आवश्यक आहे. किंवा लिलावाचे दिवशी EMD ही रोख स्वरुपात स्वीकारल्या जाईल.
7. कोणतेही कारण न दर्शविता विक्रीकरीता ठेवलेली निरुपयोगी भंगार साहित्य कोणत्याही क्षणी विक्रीतुन काढुन टाकण्याचा किंवा रद्द करण्याबाबतचा अधिकार विभागीय व्यवस्थापक, मार्खंडा वन प्रकल्प विभाग, बल्हारशाह यांनी राखुन ठेवलेला आहे.
8. खरेदीदाराने माल खरेदी केल्यानंतर त्यास सर्व अटी व शर्ती मान्य आहेत असे समजण्यात येईल.
9. यशस्वी खरेदीदाराने अनामत रक्कमेच्या समायोजनेनंतर उर्वरीत विक्री रक्कम, जी.एस.टी., आयकर अधिनियमान्वये आयकर, मुंबई विक्री कर कायदा 1959 चे तरतुदीनुसार आयकर (1%) व जी.एस.टी. ॲक्ट 2017 प्रमाणे (18%) तसेच इतर सर्व अनुज्ञेय कर रक्कमेचा भरणा खरेदीदाराची बोली मंजूर झाल्याचे तारखेपासुन 30 दिवसांचे आंत करणे बंधनकारक आहे. त्यानंतर 31 ते 45 दिवसापर्यंत 18 टक्के प्रती साल प्रती शेकडा प्रमाणे व्याज आकारण्यात येईल. 46 ते 60 दिवसापर्यंत 18 टक्के प्रती साल प्रती शेकडा व्याजासह 10 टक्के शिल्लक रक्कमेवर दंड आकारण्यात येईल. 60 दिवसापर्यंत खरेदीदारांनी संपुर्ण रक्कमेचा भरणा न केल्यास त्यांनी खरेदी केलेले गट हे जप्त करण्यात येईल. तसेच त्यांनी जमा केलेली रक्कम जप्त करण्यात येईल. सर्व देय रक्कमेचा भरणा बँक ड्राफ्ट/RTGS/Pay Order चे स्वरुपात विभागीय व्यवस्थापक, मार्खंडा वन प्रकल्प विभाग, बल्हारशाह यांचे नांवाने बल्हारशाह जि. चंद्रपुर येथील कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेच्या शाखेवर काढलेला असावा.

10. जर यशस्वी खरेदीधारक विहित मुदतीत मंजुर रक्कमेचा म्हणजे विक्री रक्कम, जी.एस.टी. व इतर अनुज्ञेय कर/आयकर ई. पुर्ण देय रक्कमेचा भरणा करण्यास असमर्थ टरला तर विभागीय व्यवस्थापक, मार्खंडा वन प्रकल्प विभाग, बल्हारशाह यांना एफडीसीएम लिमीटेडने प्रदान केलेल्या अधिकार व शक्तीनुसार अशा खरेदीदाराची स्वीकालेली बोली रद्द करण्यात येईल व अशा खरेदीधारकाचे सोबत जमा केलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व नमुद केलेली मालमत्ता पुन्हा विक्रीकरीता ठेवण्यात येईल. पुर्नविक्रीमध्ये वनविकास महामंडळास जर काही नुकसान झाले तर त्याची जबाबदारी पहिल्या यशस्वी निविदाधारकांवर राहील व नुकसानीची रक्कम थकीत राजस्व म्हणुन त्यांचेकडुन वसुल करण्यात येईल. अशी थकीत रक्कम भरणा करणेबाबत नोटीस प्रेषीत केल्यापासुन 15 दिवसांचे आंत या कार्यालयांत जमा करणे बंधनकारक राहील. जर विहित मुदतीचे आंत थकीत रक्कमेचा भरणा न केल्यास प्रचलित दरानुसार व्याज रक्कम आकारण्यात येवुन अशा सर्व रक्कमेचा भरणा करणे पहिल्या खरेदीधारकावर कायदेशीररित्या बंधनकारक राहील. मात्र पुर्नविक्रीत काही नफा झाल्यास त्यावर पहिल्या खरेदीधारकाचा कोणताही हक्क/दावा राहणार नाही.

11. यशस्वी खरेदीधारकास विक्री मंजुर झालेल्या तारखेपासुन कमाल 30 दिवसांचे आंत सर्व विक्री किंमत व अनुज्ञेय कर रक्कमेचा भरणा करुन नमुद केलेल्या निरुपयोगी भंगार साहित्याची उचल करावी लागेल. 31 ते 60 दिवसाचे आंत उचल करावयाची झाल्यास शिल्लक असलेल्या रक्कमेवर वर नमुद केल्याप्रमाणे व्याज व दंडासह खरेदीधारकांस खरेदी किंमतीच्या 2.5% जागेचे भाडे (Ground Rent) भरावे लागेल. त्यापुढील 30 दिवसाची मुदतवाढ प्रादेशिक व्यवस्थापक. एफडीसीएम लिमीटेड, चंद्रपूर प्रदेश, चंद्रपूर देवु शकतील. त्यासाठी विक्री किंमतीच्या 5% पेक्षा अधिक जागेचे भाडे असणार नाही. एवढी रक्कम जागेचे भाडे भुर्दंड म्हणुन खरेदीदारास आगावु भरावी लागेल. खरेदी किंमत तसेच जागेचे भाडे इत्यादीसह देय रक्कमेचा पूर्ण भरणा केल्यानंतरच खरेदीदारास खरेदी केलेल्या वस्तुचा ताबा देण्यात येईल. परंतु मुदतवाढीकरीता मुदत संपण्याची किमान 5 दिवसाच्या आधी अर्ज करावा लागेल. मुदतीपुर्वी अर्ज प्राप्त न झाल्यास सदर अर्जावर कोणताही विचार केल्या जाणार नाही. त्यानंतर खरेदीदाराचा सदर गटावर कोणताही अधिकार राहणार नाही व विभागीय व्यवस्थापक, मार्खंडा वन प्रकल्प विभाग, बल्हारशाह हे सदर गट पुर्नविक्रीस ठेवतील.

12. निरुपयोगी भंगार साहित्याची उचल (डिलीव्हरी) खरेदीधारक नमुद केलेल्या पूर्ण लॉटप्रमाणे देण्यात येईल. (एक लॉटचे भागाचे प्रमाणात उचल (डिलीव्हरी) देण्यात येणार नाही.) मात्र यशस्वी खरेदीधारकाने खरेदी केलेल्या संपुर्ण लॉटचे विक्री किंमतीचा व अनुज्ञेय कर रक्कमेचा भरणा केलेला असावा.

13. विक्री केलेल्या मालाची उचल वाहतूक व्यवस्था खरेदीदारास स्वत:चे खर्चाने करावे लागेल.

14. विक्री केलेल्या मालाची उचल (डिलीव्हरी) कार्यालयीन वेळेतच व कार्यालयीन दिवशीच करण्यात येईल. सुट्टीचे दिवशी उचल करु देता येणार नाही.

15. खरेदीदाराने नमुद केलेली रक्कम स्वीकृत केल्यानंतरच त्या लॉटची/निरुपयोगी भंगार साहित्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत खरेदीदाराची राहील. आग/चोरी/नैसर्गीक आपत्ती इत्यादी कोणत्याही कारणाने विक्री झालेल्या साहित्यास क्षती पोहचल्यास किंवा नष्ट झाल्यास त्यास महामंडळ जबाबदार राहणार नाही व त्याची कोणतीही नुकसान भरपाई महामंडळाकडुन देण्यात येणार नाही.

16. या निविदेतील अटी व शर्ती संबंधी उभय पक्षात काही वाद उद्भवल्यास मा. प्रादेशिक व्यवस्थापक, एफडीसीएम लिमीटेड, चंद्रपूर प्रदेश, चंद्रपूर यांचा निर्णय अंतिम राहील व तो निर्णय उभयतांना बंधनकारक राहील.

(तुषार तडस)
विभागीय व्यवस्थापक
मार्खंडा वन प्रकल्प विभाग,
बल्लारशाह

## अटीचे मान्यतापत्र

वरील सर्व अ.क्र. 1 ते 16 अटी मी वाचल्या असून त्या मान्य असल्याबाबत स्वाक्षरी करीत आहे.

खरेदीधारकाची स्वाक्षरी